*** ३०(तीस) दिवसांकरिता बंध.**

**इयत्ता: सातवी**

**(प्रथम भाषा) मराठी**

| दिवस | अपेक्षित अध्ययन फल | अध्ययन अंश | सुचविलेल्या कृतीचे नाव | कृतीचे विवरण |
|---|---|---|---|---|
| दिवस १<br>दिवस २<br>दिवस ३ | अनौपचारिक भाषेतील शब्दांचे औपचारिक( प्रमाण भाषेत) रूपांतर करणे. | भाषा ज्ञान वाढविणे.<br>शब्दसंग्रह वाढविणे. | भाषा आपली व त्यांची. | *विद्यार्थ्यांचे गट करून त्या गटांना एखादा पाठ अथवा कविता वाचणास देऊन त्यात येणारे अनौपचारीक भाषेतील शब्द निवडून त्यांची यादी सादर करावयास शिक्षक सांगतात.<br>*शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी गटवार दिलेल्या यादीतील अनौपचारिक भाषेतील शब्दांना प्रमाण भाषेतील पर्यायी शब्द लिहून त्याचे वाचन करतात व लक्षात ठेवतात. |
| दिवस.४<br>दिवस ५<br>दिवस ६ | योग्य विरामचिन्हांचा वापर करून लिहिणे. | भाषेतील विरामचिन्हांचा अर्थ सांगणे.<br>लेखन करताना योग्य विरामचिन्हांचा वापर करणे. | मी चुकत तर नाही ना? | *विद्यार्थ्यांना गटवार बसवून त्यांना वेगवेगळ्या पद्धतीने लेखन केलेल्या वाक्यपट्ट्या पुरवून त्यातील अचूक वाक्य पट्टी ओळखून प्रदर्शित करण्यात शिक्षक सांगतात व मार्गदर्शन करून त्यांचे फलकावर लेखन करतात<br>*मुलांना गटवार कृती देऊन विरामचिन्हांचा योग्य वापर करून वाक्य पट्ट्या प्रदर्शित करावयास शिक्षक सांगतात चुका झाल्या असल्यास त्या दुरुस्त करून पटवून देतात. |
| दिवस ७<br>दिवस ८ | परिचित कवितेच्या ओळी पूर्ण करणे. | शिकविलेल्या पद्यातील भाग लक्षात ठेवणे.<br>पाठांतर इत पद्य भाग जसाच्या तसा लिहिणे. | जरा आठवून पाहू.. | *विद्यार्थ्यांना दोन गटात बसवून पद्यातील एक एक कडवे देऊन ते पाठांतर करव्यास सांगतात त्यानंतर वैयक्तिकपणे म्हणवून घेतात.<br>*हसत-खेळत पद्धतीने पाठांतर झालेला पद्याचा भाग जसाच्या तसा लिहिण्यास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | सांगून तो तपासून घेतात. |
| दिवस ९<br><br>दिवस १०<br><br>दिवस ११ | दिलेल्या सूचनांचा अवलंब करून शब्दकोडे सोडविणे. | सूचनांचे वाचन करून अर्थ समजून घेणे.<br><br>स्वप्रयत्नाने कोडे सोडविणे. | चला शब्दखेळ खेळू... | *शिक्षक विद्यार्थ्यांना गटात बसवून शब्दकोडे सोडवण्यासाठी मार्गदर्शन करतात .विद्यार्थ्यांना काही क्लू देऊन ते सोडून घेतात व वर्गात प्रदर्शित करतात.<br><br>*शिक्षक स्वतः फलकावर कोडे तयार करून ते सोडविण्यासाठी मार्गदर्शन करतात आणि विद्यार्थ्यांना कोडे सोडविण्याची आवड निर्माण करतात. |
| दिवस १२<br><br>दिवस १३<br><br>दिवस १४ | घटना वाचन करून ती घटनाक्रमानुसार लिहिणे. | अचूक घटनाक्रम ओळखणे व लिहिणे. | लिहायचं ,पण नेमकं आठवुन... | *पूर्वी शिकविलेल्या पाठावर आधारित विवरण पट्ट्या देऊन त्यांचा योग्य क्रम लावण्यास शिक्षक विद्यार्थ्यांना सांगतात .योग्य वेळी मार्गदर्शन करतात.<br><br>*एखादी छोटी सोपी कथा गटात वाचावयास देऊन त्या कथेवर आधारित प्रमुख घटनांचे विवरण करणारी वाक्ये देऊन त्यांचा क्रम लावून लेखन करून घेणे. |
| दिवस १५<br><br>दिवस १६ | दिलेल्या शब्दाला समानार्थी शब्द लिहिणे. | शब्दभांडार वाढविणे.<br><br>भाषा ज्ञान समृद्ध करणे. | आणखी थोडे जाणून घेऊ.... | *साधारणपणे विद्यार्थ्यांच्या पूर्व ज्ञानावर आधारित समानार्थी शब्द संग्रह देऊन त्याचे प्रकट वाचन करून घेतात .त्यानंतर गटात बसवून सदर समानार्थी शब्दांची फ्लॅश कार्डे शिक्षक पुरवितात व ठराविक अवधी देऊन स्पर्धेच्या रूपात ती जुळवून घेतात.<br><br>*सदर कृतीसाठी लागणारे आवश्यक साहित्य पुरवून शिक्षक विद्यार्थ्यांकडून शब्दांचे तोरण बनवून घेतात आणि वर्गात प्रदर्शित करून त्याचे वाचन करवून घेतात. |
| दिवस १७<br><br>दिवस १८<br><br>दिवस | वर्णमाला समजून घेऊन लेखन करणे. | वर्णमालेतील स्वर व व्यंजन यांच्या प्रकारांचे वर्गीकरण करणे. | पुन्हा एकदा | *विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक वर्णाचे फ्लॅश कार्ड देऊन त्यांना त्या त्या गटात घेण्यासाठी शिक्षक सूचना देतील जेव्हा एखादा विद्यार्थी चूकत असेल तर इतर विद्यार्थी चर्चा करून योग्य त्या गटात त्याला घेतील उदाहरण 'अनुनासिके 'या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | | | | गटात या अशी शिक्षक सूचना देतील.<br><br>*विद्यार्थ्यांना गटवार बसवून स्वर आणि व्यंजने तसेच त्यांच्या वैशिष्ट्यानुसार वर्गीकरण करून तक्ता बनविणे. |
| दिवस २०<br><br>दिवस २१ | दिलेल्या म्हणी पूर्ण करणे. | म्हणींचा संग्रह वाढविणे.<br><br>म्हणींचा अर्थ समजणे. | चला भेंड्या खेळू...! | *शिक्षक विद्यार्थ्यांना गटात बसवून म्हणी पूर्ण करावयाची.छोटी स्पर्धा आयोजित करतात .म्हणींच्या संग्रहाचे लेखन करून नंतर सर्व म्हणींचे वाचन करून घेतात. (एक गट अर्धी म्हण दुसऱ्या गटाला देईल तीच म्हण दुसऱ्या गटाने पूर्ण करावी.)<br><br>*पूर्ण केलेल्या म्हणींचा संग्रह विद्यार्थ्यांकडून तक्त्यावर लेखन करून त्यानंतर त्यांचे प्रकट वाचन करून घेणे. |
| दिवस २२<br><br>दिवस २३<br><br>दिवस २४ | परिचित पद्याचे वर्णन करून सांगणे. | पद्य रचनेतील शब्दांचा अन्वयार्थ संबंध ओळखणे.<br><br>समजून घेतलेल्या पद याचे वर्णन करणे. | आत्ता बोलायचंच कवितेविषयी.. | *शिक्षक विद्यार्थ्यांना गट कृती करिता अध्ययन केलेल्या पद्यातील एक कडवे देऊन त्याचे रसग्रहण लेखन करून नंतर त्याचे प्रकट वाचन गटप्रमुखाकडून करून घेतात.<br><br>*प्रत्येक कडव्याचे रसग्रहण लेखन व वाचन झाल्यानंतर सदर लिखित वर्णनाचे एकत्रिकरण करून पुन्हा त्याचे विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन शिक्षक करून घेतात. |
| दिवस २५<br><br>दिवस २६<br><br>दिवस २७ | विरुद्धार्थी शब्द लिहिणे. | शब्दसंग्रह वाढविणे.<br><br>उलट अर्थाची संकल्पना स्पष्ट करणे. | जाणून घेऊ या शब्दांची दुसरी बाजू.. | वर्गात छोटीशी स्पर्धा आयोजित करून शिक्षक विद्यार्थ्यांना गटात बसवून फ्लॅश कार्डे देतात .त्या विरुद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या लावून नंतर त्यांचे विद्यार्थ्याकडून वाचन करून घेतात.<br><br>*शिक्षक विद्यार्थ्यांना विरुद्धार्थी शब्द विषयी काही नियम सांगतात त्यानुसार बनणारे विरुद्धार्थी शब्दांचे वर्गीकरण करण्यासाठी शब्दांचा संग्रह विद्यार्थ्यांना गट कृतीसाठी देतात .उदाहरण :शब्दांच्या पुढे न, बे , सु,अ,दु,ही अक्षरे जोडून तयार होणारे विरुद्धार्थी शब्द.. |
| दिवस | वाचन केलेल्या साहित्याचा अर्थ | समजलेला भाग शब्दात व्यक्त | उत्तरे देऊ | *गटाचा मॉनिटर दिलेल्या समजण्यास सोप्या असलेल्या साहित्याच्या भागाचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८<br><br>दिवस २९<br><br>दिव ३०<br><br>दिवस. ३० | समजून घेऊन विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे. | करणे.<br><br>विचारलेला प्रश्न समजून घेऊन अचूक उत्तर देणे. | अचूक... | प्रकट वाचन करतो. गटातील इतर विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतात .त्यानंतर शिक्षक सदर भागावर आधारित मौखिक प्रश्न विचारून उत्तरे घेतात.<br><br>*शिकविलेल्या भागावर आधारित प्रश्नावली देऊन शिक्षक विद्यार्थ्यांकडून त्यांची उत्तरे  लिहून घेतात. |